**जागतिक कृषि गणना योजना (Census), महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना (T.R.A.) व पीकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्यांची योजना (I.C.S.) या योजनांतर्गत मंजूर पदांवर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचे मार्च, २०२६ ते ऑगस्ट, २०२६ या सहा महिन्यांचे वेतन अदा करण्याकरिता निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ८५ /का. ११ ए (ई- १६२०६८२)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०८ मे, २०२६

**वाचा -**

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१६९/११ ए, दि.१९.१२.२०२३,
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०२६/प्र.क्र.६०/११ ए, दि.२३.०३.२०२६,
३. प्रभारी उप आयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.कृआ/कृ.ग./जागतिक कृषि गणना/२५-२६/प्र.क्र.१/४३८-र/२०२६, दि.०१.०४.२०२६,
४. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. कृआ/सां.५/प्र.क्र.१०११/TRA/२५-२६/६१/२०२६, दि.०६.०४.२०२६,
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.

**प्रस्तावना -**

जागतिक कृषि गणना योजना (Census), महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना (T.R.A.) , कृषि गणना आणि पीकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्यांची योजना (I.C.S.) योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहेत. या तीन योजनांच्या अंमलबजावणीसाठी मंजूर पदांवर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनासाठी होणारा खर्च, हा प्रस्तुत योजनांतर्गत केंद्र शासनाकडून PFMS प्रणालीद्वारे आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राप्त होणाऱ्या अनुदानातून समायोजनाने राज्य शासनाच्या लेखाशिर्षाखाली जमा करण्याच्या अटीस अधीन राहून प्रस्तुत योजनांच्या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीमधून खर्च करण्यास संदर्भ क्र. (१) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

जागतिक कृषि गणना योजना, महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना व पीकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना या योजनांमधील अस्थायी पदे (सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त असलेली पदे वगळून) सन २०२६-२७ मध्ये दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ या कालावधीकरिता चालू ठेवण्यास संदर्भ क्र. (२) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या संदर्भ क्र. (३) व (४) च्या पत्रांव्दारे प्राप्त प्रस्तावास अनुसरून जागतिक कृषि गणना योजना (Census), महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना (T.R.A.) व पीकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना (I.C.S.) या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत आयुक्तालय स्तरावरील व संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांच्या स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांच्या मार्च, २०२६ ते ऑगस्ट, २०२६ या सहा महिन्यांच्या वेतनाकरीता निधी वितरीत करण्याबाबत विनंती केली आहे. तदनुषंगाने वित्त विभागाने संदर्भ क्र. (५) अन्वये सन २०२६-२७ मध्ये "वेतन" या बाबीकरिता अर्थसंकल्पित निधीच्या ६० % च्या मर्यादेत निधी उपलब्ध करुन दिला आहे. सबब, प्रस्तुत योजनांतर्गत आयुक्तालय स्तरावरील व संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांच्या स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांच्या मार्च, २०२६ ते ऑगस्ट, २०२६ या सहा महिन्यांच्या वेतनाकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०२६-२७ मध्ये, जागतिक कृषि गणना योजना (Census), महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना (T.R.A.) व पीकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना (I.C.S.) या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत सर्व विभागीय कृषि सहसंचालक व आयुक्तालय स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांच्या मार्च, २०२६ ते ऑगस्ट, २०२६ या सहा महिन्यांच्या वेतनाकरीता "०१-वेतन" या बाबीखाली खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

(रुपये लाखात)

| अ.क्र. | योजना | मूळ तरतूद | ६० % मर्यादेत उपलब्ध निधी | वेतन मागणी (मार्च-ऑगस्ट) | वितरीत करावयाचा निधी (मार्च-ऑगस्ट) |
|---|---|---|---|---|---|
| १ | जागतिक कृषि गणना योजना | रु.३२७.०० | रु.१९६.२० | रु.५४.०० | रु.५४.०० |
| २ | महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पीकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना | रु.६५०.०० | रु.३९०.०० | रु.३२४.५३ | रु.३२४.५३ |
| ३ | पीकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्यांची योजना | रु.४००.०० | रु.२४०.०० | रु.९२.८३ | रु.९२.८३ |

२. जागतिक कृषि गणना योजना (Census), महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पिकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना (T.R.A.) व पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्यांची योजना (I.C.S.) या योजनांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनाचा खर्च पुढील लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ करीता मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा :-

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **लेखाशिर्ष** | **उद्दिष्ट** |
|---|---|---|---|
| १ | (००)(१०) जागतिक कृषि गणना योजना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम) (Census) | २४०१ ०९९६ | ०१-वेतन |
| २ | (००)(०९) कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देणे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम) (T.R.A.) | २४०१ २५६९ | ०१-वेतन |
| ३ | (००)(११) पिकांच्या आकडेवारीत सुधारणा (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम) (I.C.S.) | २४०१ २५७८ | ०१-वेतन |

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी शासन निर्णय दि.१९.१२.२०२३ मधील तरतूदी आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके यांच्या अधिन राहून खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

४. प्रस्तुत प्रयोजनार्थ, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून व आयुक्तालय स्तरावरील खर्चासाठी सहाय्यक संचालक, लेखा-१, यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत प्रकरणी देण्यात आलेला निधी केवळ “वेतन” या बाबीखाली खर्च करण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने संदर्भ क्र. (५) च्या परिपत्रकान्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०८१४३०४०८५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.05.08 14:33:03 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
३. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. उप आयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, पुणे
६. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
७. सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
८. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
९. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
११.वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२.नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३.उपसचिव (२ ए), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
१४.कक्ष अधिकारी (२ ए), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१५.कक्ष अधिकारी (१५ ए), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१६. निवड नस्ती, का.११ ए.